|| श्री गणेशाय नमः ||

हरि:ॐ

Astro • Puja • Vastu

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

## ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 95944 28749

निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 86524 02078



# श्रीदत्त माहात्म्य

## पिवळे गुरुवार व्रतकथा

तुकाराम बुक डेपो, मुंबई-४.



भक्तकवी मिलिंदमाधव विरचित

# श्रीदत्त माहात्म्य

## पिवळे गुरुवार
## व्रतकथा

For Hariom As

किंमत - १० रुपये

Proprietor

तुकाराम बुक डेपो
९७, माधवबाग, सी. पी. टँक, मुंबई-४

लेखक
मिलिंदमाधव
* सर्वाधिकार प्रकाशकाधीन *
नवीन आवृत्ती : २०१२

प्रकाशक
महेंद्र मधुकर कस्तुर
**तुकाराम बुक डेपो**
९७, माधवबाग,
सी. पी. टँक, मुंबई - ४
दूरध्वनी : २२४२ १६८९

For Hariom Astrologers
Proprietor

अक्षरजुळणी
अक्षय फोटोटाइपसेटर्स,
चित्रकूट सहनिवास, डॉ. आंबेडकर मार्ग,
ठाणे (प.) ४००६०१.

मुद्रक
शिवानी प्रिंटर्स,
खाडीलकर मार्ग,
गिरगाव, मुंबई -४

## व्रताविषयी थोडी माहिती

श्रीदत्तात्रेयाचे उजवे अंग गुरुरूप आणि डावे अंग ईश्वररूप आहे. म्हणूनच 'श्रीगुरुदेवदत्त' असा जयजयकार करतात. श्रीदत्ताच्या व्रतादी उपासनेने गुरू आणि ईश्वर या दोघांची उपासना घडते आणि तिचे फळही दुहेरी मिळते.

श्रीदत्तात्रेयांचा संचार सर्वत्र असला, तरी गिरनार पर्वतावर त्यांचे अखंड वास्तव्य असते; म्हणूनच त्या पर्वताच्या आसमंतातील प्रदेशांत- विशेषतः सौराष्ट्र-गुजरात या भागांत या व्रताचा उगम झाला असावा. हे 'पिवळे गुरुवार' व्रत लागोपाठ पाच गुरुवारी करायचे असते. व्रताच्या गुरुवारीच फक्त पिवळ्या रंगाचे बंधन आहे. व्रताच्या उद्यापनाच्या आणि नेहमीच्या व्रताला रंगाचे बंधन नाही.

पूजासाहित्यात पिवळे गंध, उगाळलेली हळद अगर कोरडी हळदबुकी; पिवळी शेवंती, सोनचाफा, सोनकेवडा, पिवळा गुलाब, कर्दळीची पिवळी फुले, यांपैकी मिळतील ती फुले, तांदळांना हळद लावलेल्या अक्षता; नैवेद्याला पिवळे पेढे, पिवळे गूळ अगर पिवळे चणेहि चालतात. महानैवेद्यात (आणि भोजनात) पिवळा भात, (तुरीची डाळ, तांदूळ यांची हळद घालून केलेली पिवळी खिचडी) वरण, वाटली डाळ, चण्याच्या पिठाचा म्हैसूरपाक सारखी मिठाई असावी. चण्याच्या पिठाच्या पदार्थांचा जास्त उपयोग करावा. फळांत पिकलेली पपई, आंबा, राजाळे केळे इत्यादींपैकी एखादे पिवळे फळ दत्तासमोर ठेवावे. इतर माहिती या पोथीत आहेच.

केवळ स्मरणाने संतुष्ट होणे हे श्रीदत्तात्रेयाचे वैशिष्ट्य आहे. म्हणून या पोथीत दिलेला बारा अक्षरी सिद्धमंत्र, व्रतांत अगर इतर दिवशी नित्य जपावा व श्रीदत्तकृपेचा लाभ घ्यावा.

श्रीदत्तात्रेयकृपेने सर्वांचे सकलकल्याण होवो, हीच सदिच्छा!



रोजच्या श्रीदत्त-गुरुउपासनेसाठी

## काही मंत्र

श्रीदत्तवंदन :- मालाकमण्डलुधरः करपद्मयुग्मे। मध्यस्थपाणियुगले डमरुत्रिशूले।
यस्य स्त ऊर्ध्वकरयोः शुभशंखचक्रे।
वन्दे तमत्रिवरदं भुजषट्कयुक्तम्॥१॥

श्रीदत्तचिंतन :- जय जय दत्ता अवधूता। जय जय दत्ता अत्रिसुता।
जय जय दत्ता भगवंता। प्रसन्न व्हावे तू आता॥२॥

श्रीदत्तमंत्र :- (बारा अक्षरी) ॐ नमो भगवते दत्तात्रेयाय॥३॥

श्रीगुरुमंत्र :- देवानं च ऋषीणां च गुरुं कांचनसंनिभम्।
बुद्धिभूतं त्रिलोकेशं तं नमामि बृहस्पतिम्॥४॥



भक्तकवी मिलिंदमाधव विरचित

# श्रीदत्त माहात्म्य

## व्रतकथा

(पिवळे गुरुवार व्रत)

ॐ नमो भगवते दत्तात्रेयाय॥ ॐ नमो श्रीगजवदना। गणराया गौरीनंदना। विघ्नेशा भवभयहरणा। नमन माझे साष्टांगी॥१॥ नंतर नमिली श्रीसरस्वती। जगन्माता भगवती। ब्रह्मकुमारी वीणावती। विद्यादात्री विश्वाची॥२॥ नमन तैसे गुरुवर्या। सुखनिधान सद्गुरुराया। स्मरुनी त्या पवित्र पाया। चित्तशुद्धि जाहली॥३॥ थोर ऋषिमुनी संतजन। बुधगण आणि सज्जन। करुनी तयांसी नमन। ग्रंथरचना आरंभिली॥४॥ श्रीदत्तात्रेय अवधूत। दैवत श्रेष्ठ आणि जागृत। गुरुवारी करिता तयाचे व्रत। दर्शन देई प्रत्यक्ष॥५॥ जळी स्थळी काष्ठी पाषाणी। दत्तभगवंत भरला असुनी। मानसपूजा करिता मनी। साक्षात्कार होतसे॥६॥ श्रद्धावान जे दत्तभक्त। आचरती जे दत्तव्रत। तयांनाच कळेल फक्त। माहात्म्य श्रीगुरुदत्ताचे॥७॥ श्रद्धेचे महत्त्व फार मोठे। श्रद्धा नसता सर्व खोटे। श्रद्धावंतांसी

फळ गोमटे। मिळते दत्तभक्तीचे ।।८।। कोणत्याही व्रतासाठी दृढ श्रद्धा असावी गांठी। संशयवृत्ति नसो खोटी। संशय मूळ नाशाचे ।।९।। सांगेन आता यापुढती। श्रीदत्तव्रताची माहिती। ऐका सावधान चित्ती। म्हणे मिलिंदमाधव ।।१०।। याला झाली वर्षे फार। एक होते छोटे नगर। रम्य आणि मनोहर। शांत निवांत स्थान ते ।।११।। राजा नामे तेथील ब्राह्मण। सत्यनिष्ठ आणि सज्जन। यथार्थ करी धर्माचरण। यज्ञयागादि करुनिया ।।१२।। ईश्वरकृपे साध्वी कल्याणी। लाभली होती त्याला पत्नी। पतिसेवा करी नाना यत्नी। सुमता होते नाव तिचे ।।१३।। लक्ष्मी आणि कमलापती। तैसी ती दोघे शोभती। सद्धर्मप्रेमी दंपती। दुर्मिळ जगती दिसावया ।।१४।। तयांचे होते घरकुल छोटे। त्यातच त्यांना समाधान वाटे। मनोराज्याचे राजवाडे खोटे। त्यांनी नाही इच्छिले ।।१५।। शुचिर्भुत शुद्ध आचरण। मन ठेविती सदा प्रसन्न। यथाशक्ति देती दान। गोरगरीब अपंगांना ।।१६।। जे जे रंजलेगांजले। त्यांसी त्यांनी जवळ केले। भुकेल्यांना तृप्त केले। अन्नपाणी देऊनी ।।१७।। त्यांना नव्हते काही उणे। सर्व काही होते देवदयेने। परंतु त्यांच्या दुर्दैवाने। संतति मात्र जगेना ।।१८।। मुले जन्मती जरा वाढती। परी अचानक मरण



पावती। घोर दुःखराशी कोसळती। ऐसे झाले अनेकदा ।।१९।। व्रतेवैकल्ये खूप केली। परि सर्व ती वाया गेली। इच्छा त्यांची अपूर्ण राहिली। संतति सौख्य मिळेना ।।२०।। राजा ब्राह्मण पत्नि सुमता। खिन्न वदने करिती चिंता। मनी म्हणती 'हे भगवंता। काय आता करावे' ।।२१।। यागायोग खरा विलक्षण पुढे उगवला एक सुदिन। साध्वीची एक बालमैत्रीण। आली तिच्या भेटीला ।।२२।। भेटल्या दोन्ही जिवलग मैत्रिणी। हर्ष दाटला त्यांचे मनी। परंतु दुसऱ्याच क्षणी। सुमता दुःखी भासली ।।२३।। मैत्रीण म्हणाली स्वतःशी। मी आले हिच्या घरासी। ते न रुचले हिच्या मनासी। असेच सत्य असावे ।।२४।। आठ्या घालुनी कपाळास। दिसते मुद्दाम उदास। मीतरी आता कशास। इथे आणखी थांबावे ।।२५।। मग म्हणे ती साध्वीला। जाते मी माझ्या घराला। तुला उगीच त्रास कशाला। इथे माझ्या येण्याचा ।।२६।। साध्वी म्हणजे मैत्रिणीला। अगं आमच्या या उंबरठ्याला। पाय तुझा लागला न लागला। तोच कुठे निघालीस ।।२७।। तुझ्या येण्याचा त्रास कसला। उलट आज सुदिन वाटला। मैत्रीण भेटीचा आनंद झाला। किती मंगल वेळा ही ।।२८।। तेव्हा विचारी मैत्रीण। तुझे हे वदन का बरे खिन्न। सांग आधी जवळ बैसून। स्पष्ट खरे काय

ते ।।२९।। सतीचे त्या भाबडे मन। आतून वितळले चटकन्। वाहू लागल्या नेत्रांतून। अश्रुधारा घळघळा ।।३०।। कंठ आला दाटून। शब्द फुटेना ओठातून। तरीही हुंदके आवरून। स्वतःस तिने सावरिले ।।३१।। मग मैत्रिणीला सांगू लागली। परमेश्वराने सर्व कृपा केली। परंतु संतति नाही जगविली। दुःख ते न सोसवे ।।३२।। आई ही दोन अक्षरे। कधी ऐकेन सांग बरे। मम बाळांना प्रेमभरे। कुरवाळीन कधी मी ।।३३।। आमही दोघे रात्रंदिन। असतो सदा बेचैन। उदास आणि खिन्नसुन्न। शांति नाही मनाला ।।३४।। ऐकुनी ते बोल करुण। मैत्रिणीचे द्रवले अंतःकरण। म्हणे असा धीर सोडून। निराश नको होऊ तू ।।३५।। मी सांगते ते आता ऐक। एक व्रत आहे अति सुरेख। ते आचरिता निःशंक। इच्छिलेले मिळेल ।।३६।। अधिर झाली साध्वी सुमता। म्हणे झडकरी सांग आता। मी आचरीन त्या व्रता। मनोभावे भक्तीने ।।३७।। कोणता देव कोणते व्रत। पूजाविधीही सांग समस्त। उपकार होतील अनंत। तुझे खरोखरी मजवरी ।।३८।। मैत्रिणीने मग साध्वीला। व्रतविधी तो पवित्र आगळा। प्रेमे सगळा सांगितला। तोच आता ऐकावा ।।३९।। त्रिमूर्तींचा जो अवतार। श्रीदत्तरूपे झाला साकार। विश्वाधार तो विश्वंभर। सर्वव्यापी दयाळू ।।४०।। त्या दत्ताचा जो वार।



पवित्रपावन गुरुवार। त्या दिवशी हे व्रत थोर। नरनारींनी करावे ।।४१।। असती काही इच्छा मनी। नम्र व्हावे श्रीदत्तचरणी। आणि दत्तपूजन त्या दिनी। मनोभावे करावे ।।४२।। एक वेळ करावे उपोषण। प्रसन्न ठेवावे आपुले मन। करू नये असत्य भाषण। भांडणतंटा टाळावा ।।४३।। सकाळी आधी करावे स्नान। पिवळे वस्त्र करावे परिधान। पिवळेच पूजासाहित्य घेऊ। दत्तपूजा करावी ।।४४।। पिवळ्या असव्या अक्षता। पिवळ्या वस्तू नैवेद्याकरिता। पिवळ्या रंगाची अपूर्वता। असावी या व्रताला ।।४५।। पिवळी घ्यावी सुंगधी फुले। पिवळीचे असावी पक्व फळे। पूजा संपता त्यावेळे। श्रीदत्त माहात्म्य वाचावे ।।४६।। नमस्करी करावा दत्तास। रात्री सोडावा उपवास। भोजनात सर्व जिन्नस। पिवळे पिवळे असावे ।।४७।। व्रत हे सहेतुक उपोषण। ते नव्हे निष्काम पूजन। म्हणूनी रंगाचे बंधन। पाळलेच पाहिजे ।।४८।। महत्त्व पिवळ्या रंगाचे। व्रतासाठीच आहे साचे। नंहमींच्या गुरुवारी त्याचे बंधन पाळू नये कुणी ।।४९।। यथासांग करुनी पूजन। महानैवेद्य करावा अर्पण। गायीस एक पान वाढून। नंतर आपण जेवावे ।।५०।। पूजा करावी सकाळी। किंवा वाटल्यास संध्याकाळी। किंवा आपल्या सोयीच्या वेळी। यथाविधि पूजा

करावी ।।५१।। दत्तमूर्ति पूजावी घरी। किंवा जावे दत्तमंदिरी। तसबीर दत्ताची गोजिरी। पूजेसाठी चालते ।।५२।। पूजाविधि संपल्यावरती। ओवाळाव्या पंचज्योती। म्हणावी दत्ताची आरती। आणि मागणे मागावे ।।५३।। जय जय दत्त अवधूता। जय जय दत्ता अत्रिसुता। जय जय दत्ता भगवंता। प्रसन्न व्हावे तू आता ।।५४।। देवाधिदेवा श्रीदत्तगुरु। तू गाय मी तुझे वासरू। प्रेमपान्हा दे नको अव्हेरू। अपराधांची क्षमा करी ।।५५।। तू मजवरी कृपा करावी। मनीची इच्छा पूर्ण व्हावी। संतति दीर्घायुषी लाभावी। सर्व कुटुंबीय सुखी असो ।।५६।। मग करावे साष्टांग नमन। नम्रतेने मनापासून। श्रीगुरुग्रहासी स्मरून। दत्तचिंतन करावे ।।५७।। लागोपाठ पाच गुरुवारी व्रत करून। सहाव्या गुरुवारी करावे उद्यापन। दीनदुबळ्यांस द्यावे दान। दत्तमंत्र जपावा ।।५८।। उद्यापनाचे पूजासाहित्यास। किंवा नैवेद्यादि वस्तूंस। भोजनाच्याहि पदार्थांस। बंधन नाही रंगाचे ।।५९।। ऐसे व्रत केल्यावरी मनःशांति लाभेल सत्वरी। सुखसमृद्धि नांदेल घरी। हेतु सफल होतसे ।।६०।। म्हणुनी हे सुमतामैत्रिणी। लाग आता तू गुरुचरणी। श्रीदत्तव्रत आचरुनी। सुखी होशील जन्माची ।।६१।। इच्छित संतति उपजेल उदरी। होईल ती सदाचारी सद्विचारी।



दत्तकृपा होईल तयावरी। अपरंपार अखंडित ।।६२।। आयुष्य आरोग्य बल बुद्धि। या सर्वांची होईल वृद्धि। दत्तकृपेने सकल समृद्धि। आणि सुखे लाभती ।।६३।। जे जे नरनारी व्रत करिती। ते ते सगळे सुखी होती। होते इच्छित फलप्राप्ति। दत्त-गुरूच्या कृपेने ।।६४।। ऐकूनी मैत्रिणीचे भाषण। पुलकित झाले साध्वीचे मन। तिने मग निर्धार करून। संकल्प केला व्रताचा ।।६५।। त्यानंतर दोन दिवसांनी। मैत्रीण गेली स्वगृहा तेथुनी। साध्वीने मग पतीला सांगुनी। अनुमती मिळविली व्रताला ।।६६।। राजा ब्राह्मण झाला खूश। तो म्हणाला आपल्या पत्नीस। व्रत करुनी दत्तगुरूस। अवश्य आता विनवूया ।।६७।। लगेच पुढच्या गुरुवारी। व्रताची केली सर्व तयारी। पूजेची झाली सिद्धता सारी। आणि केले उपोषण ।।६८।। व्रताचे गुरुवार पाच केले। सहाव्या गुरुवारी उद्यापन झाले। त्याच दिवशी नवल घडले। योगी आला दारात ।।६९।। 'अलुख' ऐसा दिव्य पुकार। साध्वीने ऐकला साचार। धावत जाऊनी उघडिता दार। साधु एक देखिला ।।७०।। रुद्राक्षभूषणे भगवीं छाटी। भाली भस्म हाती काठी। प्रसन्न मुद्रा जटा मोठी। काखे झोळी लोंबतसे ।।७१।। पदी पादुका शोभती भारी। तेजस्वी रूप सौख्यकारी। ऐसी मूर्ति सतीच्या दारी। भिक्षार्थ उभी

ठाकली ।।७२।। दारी आलेला अतिथी। रिक्त हस्ते न जाय पुढती। स्वागत त्याचे करावया ती। तत्पर असे सर्वदा ।।७३।। तिने दोन्ही हात जोडिले। नम्रपणे साधूस वंदिले। म्हणे आपण यावेळे। कृपया क्षणभर थांबावे ।।७४।। साध्वी मग आत गेली। पूजासाहित्य घेऊनि आली। अतिथीची पूजा केली। आदराने झडकरी ।।७५।। लगबगीने तशीच गेली। शिधा फळे घेऊनी आली। साधूच्या झोळीत घातली। योगी झाला संतुष्ट ।।७६।। साध्वीने मग डोळे मिटून। साधूस केले साष्टांग नमन। तो साधू नव्हता दुसरा कोण। प्रत्यक्ष दत्त भगवंत ।।७७।। सत्य रूप प्रकट झाले। कोटी सूर्यांचे तेज फाकले। साध्वीचे डोळे दिपून गेले। दत्तकृपा जाहली ।।७८।। दत्त म्हणती माते श्रद्धेने। माझी झोळी भरलीस शिध्याने। तुझे घर भरेल संततिसंपत्तीने। उत्कर्ष तुमचा होईल ।।७९।। जे जे हवे असेल तुजसी। ते सर्व माग माझ्यापाशी। वैभव ऐश्वर्य सुवर्णराशी। देईन मागशील ते ।।८०।। साध्वी म्हणाली मायबापा। आम्हांवरी असावी तुमची कृपा। निवारुनिया सकल भवतापा। मनीची इच्छा पुरवावी ।।८१।। मज संबोधिले माते म्हणून। ते व्हावयासी सत्य जाण। आपण आता पुत्र म्हणून। जन्म घ्यावा मम उदरी ।।८२।। जन्म जरा आणि मरण। सोडवी या



चक्रातून। हीच विनंती हात जोडून। कुशल करावे आमुचे ।।८३।। 'तथास्तु' म्हणुनी श्रीदत्त। तिच्या मस्तकी ठेवुनी हस्त। आपण झाले क्षणात गुप्त। साध्वी आली भानावरी ।।८४।। पतीस सांगितले वर्तमान। म्हणाली घडले श्रीदत्तदर्शन। आता त्याचे कृपे करून। भाग्य अमुचे उजळेल ।।८५।। धन्य धन्य षतही सुमता सती। धन्य धन्य तो तिचा पती। दोघे सुखाने नांदती। ठेवुनि श्रद्धा दत्तावरी ।।८६।। दर गुरुवारी करुनी उपोषण। करिती दोघे श्रीदत्तपूजन। मनीच्या मनी श्रीदत्त चिंतन। चाले नित्य नेमाने ।।८७।। दिवसामागून दिवस गेले। मनासारखे सर्व झाले। श्रीदत्तव्रताचे फळ मिळाले। आनंदी आनंद जाहला ।।८८।। दीर्घायुषी सद्गुणी बाळ। दत्ततेज विलसे वदनी उज्ज्वल। राजा आणि सुमताचे कुळ। पावन केले भगवंते ।।८९।। अनिष्ट असता गुरुग्रह। कार्ये बिघडती समग्र। होताच तयाचा अनुग्रह। श्रमाचे सार्थक होतसे ।।९०।। नऊ ग्रहांमाजी महान। गुरु दिसतो फार छान। पीतरंगी प्रकाशमान। आकाशी भ्रमण करीतसे ।।९१।। जन्म-कुंडलीत लग्नस्थानी। द्वितीयात पंचमात सप्तमस्थानी। नवमात दशमात लाभस्थानी। गुरु शुभकारक जाणावा ।।९२।। यश कीर्ति उच्च शिक्षण। अध्यात्मयोग तत्त्वज्ञान। साध्य

नसे गुरुकृपेवीण। गुरु उपासना करावी।।९३।। हे 'पिवळे गुरुवार व्रत'! आचरिता होई गुरु शांत। प्रसन्न होईल दत्त भगवंत। कल्याण करील सर्वांचे।।९४।। गुरुबलदायक ही व्रतकथा। दर गुरुवारी केवळ वाचिता। मिळते मानसिक शांतता। चित्त स्थिर होतसे।।९५।। यातील दत्तचिंतन अमृत। सेविता पळते पिशाच भूत। जखीण समंध समस्त। यांची पीडा न बाधे।।९६।। गुरुमंत्राची संजीवनी। रोगव्याधी दूर करुनी। आयुष्य वाढवी दिनोदिनी। श्रद्धामात्र असावी।।९७।। जेथे होईल या ग्रंथाचे पठण। त्या घरी नांदेल शांति पूर्ण। कमी पडणार नाही धनधान्य। श्रीगुरु-दत्तात्रेय कृपेने।।९८।। विद्या लाभे विद्यार्थ्यांसी। रोजगार मिळे बेकरासी। तेजी येते व्यापारासी। धनवृद्धि होतसे।।९९।। जे कोणी शेती करिती। त्यांना भरघोस पिके मिळती। कलावंतांच्या कलाकृती। लोकप्रिय होतील।।१००।। कौतुक होईल कारागिरांचे। लग्न होईल लग्नार्थियांचे। कर्मचारी कामकरी यांचे पूर्ण होतील मनोरथ।।१०१।। यश मिळते परीक्षेत। बढती मिळते नोकरीत। दूर पळते पिशाच भूत। आनंदसुख लाभते।।१०२।। गरिबीने जे गांजले असती। दत्तगुरु त्यांसी संतोषविती। दैन्य त्यांचे दूर करिती। स्मरणमात्रे झडकरी।।१०३।। श्रीदत्तात्रेय



अनसूयानंदन। करुणाघन जगज्जीवन। संकटकाळी येई धावून। विश्वास मनी धरावा।।१०४।। हे माहात्म्य घेऊनी। वाचावे सर्व स्त्रीपुरुषांनी। मन लावावे श्रीदत्तचरणी। विनवी मिलिंदमाधव।।१०५।। हे श्रीदत्ता सद्गुरुनाथा। सुखी झाली ती सती सुमता। तशी कृपा करी मजवरी आता। मनोरथ सफल होऊ दे।।१०६।। दत्तात्रेया दत्तनाथा। त्रिगुणात्मका त्रिगुणातीता। त्रिभुवनपालका भक्तनाथा। श्रीगुरुदत्ता नमोनमः।।१०७।। जटाधारी यतीवरा। त्रिशुळ डमरू शंकचक्रधरा। माला कमंडलु शोभती करा। श्रीगुरुदत्ता नमोनमः।।१०८।। पुराणतत्त्वा ब्रह्ममोहना। जगत्पालका ब्रह्मसनातना। प्रणवातीता प्रेमवर्धना। श्रीगुरुदत्ता नमोनमः।।१०९।। सकल दत्तभक्त सुखी असो। चिंता-व्याधी मुळी नसो। दत्तमूर्ति हृदयी वसो। म्हणे मिलिंदमाधव।।११०।।

ॐ श्रीदत्तात्रेयाय नमः।। ॐ श्रीगुरवे नमः।। ॐ शांतिः शांतिः शांतिः।।

श्रीगुरु-दत्तार्पणमस्तु।। शुभं भवतु।। (ओवी संख्या ११०)

।। मिलिंदमाधवकृत श्रीदत्तमाहात्म्य संपूर्ण।।

卐 卐 卐

# श्रीदत्ताची आरती

जय जय श्रीगुरुदत्ता, अनसूया-तनया। धन्य दिगंबरदर्शन, देसी तू सदया।
तव स्मरणाने येते, प्रसन्नता चित्ता। आरति ओवाळिता, नुरते भवचिंता ।।१ ।। जय० ।।
त्रिगुणात्मक त्रयमूर्ती, हात सहा जाणा। चारहि वेद अखंडित, प्रक्षाळिती चरणा।
त्रिशुळ शंखचक्रादिक षडायुधे हाती। तेजःपुंज सुकोमल, दिव्य देहकांती ।।२ ।। जय० ।।
कंठी रुद्राक्षाच्या, सुमनांच्या माळा। माथा भार जटेचा, पार न स्वरूपाला।
चट चट पायी खडावा, त्रैलोक्यी फेरी। ऐसा दत्तगुरु हा, आमुचा कैवारी ।।३ ।। जय० ।।
स्थिरचर व्यापक आहे, औदुंबरवासी। परंतु महिमा नकळे, आगमनिगमासी।
श्रीपादवल्लभ स्वामी, दत्ता अवधूता। मिलिंदमाधव तुझिया, लीन पदी आता ।।४ ।। जय० ।।

तुकाराम बुकडेपो मुंबई

आमच्या येथे सर्व प्रकारची धार्मिक, आध्यात्मिक, ज्योतिष व शालेय पुस्तके तसेच नविन वर्षाच्या दिनदर्शिका व डायऱ्या होलसेल व किरकोळ दराने मिळतील.

# तुकाराम बुक डेपो

१७/ सी.पी.टँक रोड, गिरगांव, मुंबई - ४०० ००४.

दुरध्वनी : २२४२१६८९/ २२४०५७९८

Astro • Puja • Vastu

# FALIT JYOTISH AND VASTU SHASTRA CONSULTANT

## FOR ALL DHARMIK POOJA'S

SHRI GANESH PUJA

SHRI SATYANARAYAN PUJA

VASTU SHANTI

WEDDING | SAKHARPUDA | MUNJ

JANANA SHANTI | RUDRABHISHEK

SAPTASHATI PATH | HAVAN | ETC.

## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA


**SANPADA OFFICE**
Office No. 8, 1st Floor, Shiva Triveni Galleria CHS., Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai - 400705.

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai - 400043.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers

hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com